पनवेल (प्रतिनिधी) निस्वार्थीपणे समाजाची सेवा करणारे तसेच कला, क्रीडा, शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय आदी क्षेत्रात आदर्श असणारे व आपल्या कार्याचा ठसा सर्वत्र उमटवून सर्व समाजाला प्रेरणा देणारे बहुजनांचे दाते, गरिबांचे कैवारी आणि सकलजनांचा आधार व ऋषीतुल्य व्यक्तीमत्व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ६३ व्या वाढदिवसानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांनी, पदाधिकाऱ्यांनी तसेच हजारो कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिष्टचिंतन करून त्यांना दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या निवासस्थानी झालेल्या अभिष्टचिंतन सोहळयात रायगड जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष आर.सी.घरत, आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार मधुशेठ ठाकूर, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, ज्येष्ठ नेते डॉ.भक्तीकुमार दवे, कामगार नेते शाम म्हात्रे, पनवेल तालुकाध्यक्ष लक्ष्मणशेठ पाटील, कार्याध्यक्ष अरूणशेठ भगत, माजी तालुकाध्यक्ष गोकुळशेठ पाटील, इंटकचे प्रदेश कार्याध्यक्ष महेंद्र घरत, नगराध्यक्षा चारूशिला घरत, उपनगराध्यक्ष मदन कोळी, मुख्याधिकारी डॉ.सुधाकर जगताप, शिक्षण मंडळाचे सभापती वाय.टी.देशमुख, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी राजेंद्र पाटील, प्रसिध्द नेत्रतज्ञ डॉ.सुहास हळदीपूरकर, रयत शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.गणेश ठाकूर, माजी सचिव डॉ.अरविंद बुरूंगळे, संघर्ष समितीचे अतुल पाटील, माजी नगराध्यक्ष मोतीशेठ बांठिया, सईद मुल्ला, परशुराम जितेकर, गटनेते अनिल भगत, बांधकाम सभापती राजु सोनी, शिक्षण सभापती एकनाथ गायकवाड, महिला व बाल कल्याण सभापती नीता माळी, कॉंग्रेस कमिटीचे शहर अध्यक्ष जयंत पगडे, कार्याध्यक्ष अरविंद सावळेकर, नगरसेवक संतोष शेट्टी, मनोहर म्हात्रे, गणेश पाटील, गणपत म्हात्रे, लतीफ शेख, नगरसेविका कल्पना ठाकूर, नाज हाफीज, निर्मला म्हात्रे, अलका भगत, मंगला राणे, स्मिता पाटील, सुनंदा पाटील, संगिता कांडपाल, ज्येष्ठ नेते पी.जे.पाटील, उरण तालुका कॉंग्रेसचे अध्यक्ष मिलिंद पाडगावकर, चंद्रकांत घरत, युवा नेते परेश ठाकूर, जिल्हा परिषदेतील पक्षप्रतोद सदस्य राजेंद्र पाटील, अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश बिनेदार, विचार विभागाचे जिल्हाध्यक्ष कांतीलाल कडू, जिल्हा परिषद सदस्य वैजनाथ ठाकूर, विनोद म्हात्रे, भारती मुंगाजी, इंटकचे तालुकाध्यक्ष संजय पाटील, उद्योगपती हरिश्चंद्र पाटील, के.ए.म्हात्रे, कृषि विभागाचे प्रदेश सचिव के.एस.पाटील, विजय शिरढोणकर, पंडीत कल्याणकर, नाना खुटले, जिल्हा कॉंग्रेसचे उपाध्यक्ष सुदाम पाटील, सतिश गायकवाड, महिला कमिटीच्या तालुकाध्यक्षा ॲड.आशा भगत, शहर अध्यक्षा वर्षा नाईक, उरण तालुका महिलाध्यक्षा सिमा घरत, मावळ लोकसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष किशोर चौतमोल, पनवेल विधानसभा अध्यक्ष दशरथ म्हात्रे, मानव संसाधन विभागाचे जिल्हाध्यक्ष अभिजीत पाटील, उरण उत्कर्ष समितीचे अध्यक्ष गोपाळ पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सुभाष पाटील, महिलाध्यक्षा संतोषी मोरे, ॲड.प्रफुल्ल म्हात्रे, ॲड.मदन गोवारी यांच्यासह विविध विभागांचे तालुका व शहर अध्यक्ष, डॉक्टर, वकील, विविध वृत्तपत्र-चित्रवाहिन्यांचे पत्रकार, विविध विद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, विविध पक्षातील नेते, सामाजिक संस्था-संघटनांचे पदाधिकारी, विभागीय अध्यक्ष, आजी-माजी नगरसेवक, सरपंच, उपसरपंच, सदस्य, कार्यकर्त्यांनी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.